## निशाणी क्रमांक १६ वरील आदेश

(दिनांक २२.१०.२०२४)

प्रस्तुत अर्ज धनाको मार्फत दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश ६ नियम १७ व आदेश ०१ नियम १० प्रमाणे दरखास्तमध्ये नवीन ऋणको समाविष्ट करण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तावित ऋणको यांना नोटीस तामिल होवूनही ते हजर झाले नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुध्द विना म्हणणे चालविण्यात येत आहे.

०२. अभिलेखावरील कागदपत्रे व दिवाणी प्रक्रिया संहितेचे संबंधीत तरतूदीचा संदर्भ घेतला व धनाकोचा युक्तिवाद ऐकला व त्यावरुन खालील वादप्रश्न माझे विचाराधीन आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत प्रकरणाच्या खऱ्या वाद मुद्याचा निष्कर्ष होण्यासाठी प्रस्तावित ऋणको अशोक गणपतराव गाठे, रा.अयोध्या नगर, नागपूर यांना दरखास्त मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे का ? | होकारार्थी |
| २ | दिवाणी दावा क्रमांक ५३/२०१२ मध्ये हुकूमनाम्याच्या अमलबजावणीकरिता प्रस्तावीत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | होकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | ........ अर्ज मंजूर करण्यात येतो. |

**<u>वाद प्रश्न क्र. १ व २ करिता</u> –**

०३. प्रस्तुतची दरखास्त धनको ललीत रामकुमार शर्मायांनी दाखल केली आहे. त्यांच्यामते दिवाणी दावा क्र.५३/२०१२ मध्ये त्यांच्या हक्कामध्ये हुकूमनामा झाला आहे. त्याद्वारे प्रतिवादी अथवा ऋणको ताराबाई शेळके यांनी वाद मिळकतीचे खरेदीखत वादीच्ह क्कामध्ये करुन देणे ऋणकोवर बंधनकारक आहे. परंतु दावा क्र. ५३/२०१२ च्या न्यायनिर्णयानंतर ऋणकोने प्रस्तावित ऋणको गौरव दिलीपराव साबळे यांना विक्री केली आहे. त्यामुळे दावा क्र. ५३/२०१२ मधील हुकूमनाम्याच्या अमलबजावणीसाठी प्रस्तावित ऋणको गौरव दिलीपराव साबळे यांचे या प्रकरणात आवश्यकता आहे.

०४. अभिलेखावर असलेला दिवाणी दावा क्र.५३/२०१२ चा हुकूमनामा पाहिला

असता त्यामध्ये ऋणको ताराबाई शेळके यांना धनकोच्या हक्कामध्ये गट क्र.७३ मधील जमीनीची खरेदीखत वादीच्या हक्कामध्ये करुन दिलयाचे आदेशित केले आहे.

**०५.** धनको मार्फत अभिलेखावर नि.क्र. १५ सोबत दोन खरेदीखताच्या प्रती दाखल केल्या आहेत. खरेदीखत क्रमांक २८५/२०२२ वरुन असे दिसून येते की, ऋणको ताराबाई शेळके यांनी सर्वे नं. ७३ मधील शेत गौरव दिलीपराव साबळे यांना डिक्री केले आहे. तदनंतर खरेदी खत क्रमांक ११३४/२०२२ प्रमाणे गौरव दिलीपराव साबळे यांनी संबंधित शेत हे अशोकराव गणपतराव गाठे यांना विक्री केल्याचे दिसून येते.

**०६.** संबंधित खरेदीखत क्र.११३४/२०२२ अन्वये सद्यस्थितीला वावदग्रस्त मिळकत ही अशोकराव गणपतराव गाठे यांच्या नावे असल्याचे दिसून येते. त्यामुळे दि.दा. क्र.५३/२०१२ मधील हुकूमनाम्याची अमलबजावणी होण्यासाठी अशोक गणपतराव गाठे हा प्रस्तुत प्रकरणामध्ये महत्वाचा पक्षकार असल्याचे आढळून येते. त्याच्या उपस्थितीशिवाय संबंधित हुकूमनाम्याची अंमलबजावणी शक्य नाही. करिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

## <u>आ दे श</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. १६ मंजुर करण्यात येतो.

०२. अशोक गणपतराव गाठे, रा.अयोध्या नगर, नागपूर यांना ऋणको क्र. २ म्हणून समाविष्ट करण्यात येते.

०३. धनकोने प्रस्तुत दावा दुरुस्ती १४ दिवसाचे आत करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत सादर करावी.

०४. या अर्जाचा खर्च धनकोवर ठेवण्यात येतो.

AMBHORE SHANKAR BABURAO
Digitally signed by AMBHORE SHANKAR BABURAO
Date: 2024.10.22 17:16:19 +0530

दिनांक २२.१०.२०२४

(एस.बी. अंभोरे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदगाव खं.

# Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Dongare |
| Court Name | : | Court of C.J.J.D., Nandgaon Kh. |
| Date | : | 22/10/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 22/10/2024 |
| Order uploaded on | : | 25/10/2024 |

XXXX